आदेश निशाणी क्र. १ वर
(घोषित दिनांक १४ फेब्रुवारी २०२५)

१. उपरोक्त आरोपीविरुध्द भारतीय दंड संहितेचे कलम ४२०, ४६५, ४६७, ४७१, ४६८ सहकलम ३४ अन्वये खटला चालविण्यात आला. उपरोक्त प्रकरणात आरोपींना वारंवार समन्स व वॉरंट काढण्यात आले. परंतु आरोपी न्यायालयात हजर झाले नाहीत. त्यामुळे आरोपींना फरारी घोषीत करुन त्यांच्या उदघोषनेचा जाहिरनामा काढण्यात आला. तरी देखिल प्रस्तूुत आरोपी मिळुन आले नाहीत. त्यामुळे सदरचे प्रकरण आरोपींविरुध्द फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २९९ प्रमाणे त्यांच्या गैरहजेरीत चालविण्यात आले. उदघोषनेचा अहवाल नि.क्र.२७ वर दाखल आहे. त्यानंतर फिर्यादी तसेच इतर प्रत्यक्षदर्शी साक्षीदारांना समन्स काढण्यात आले असता इतर साक्षीदार हे दिलेल्या पत्यावर मिळुन आले नाहीत. त्यानंतर अभियोगपक्षातर्फे फिर्यादी व साक्षीदार यांचा फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २९९ प्रमाणे जबाब नोंदविण्यात आला.

२. अभियोगपक्षातर्फे तपासण्यात आलेले फिर्यादी साक्षीदार क्र. १ गणेश जयशंकर कोळी यांनी त्यांच्या साक्षीत कथन केले की, सन २०१४ मध्ये ते दिघा येथे राहत होते. त्यावेळेस ते कोहीनुर टेक्नीकल अन्सटीटयुट या ठिकाणी इन्स्टक्टर म्हणुन काम करत होत. त्यावेळी ते जागा खरेदीच्या विचारात होते त्यामुळे ते आरोपीच्या संपर्कात आले. त्यावेळेस एजंट संतोष पाटील याने शेलु या ठिकाणी बांधीवली गावात प्लॉट असल्याचे सांगितले. तो प्लॉट ते पाहुन आले. त्यानंतर त्यांनी एजंट संतोष पाटील याच्याकडे ज्या ज्या कागदपत्रांची मागणी केली ते ते कागदपत्र तो पुरवत गेला. त्यानंतर त्याने सदर प्लॉट मालकाची भेट घालुन दिली. सदरचा प्लॉट रक्कम रु.७,५०,०००/- रुपयात खरेदी करण्याचे ठरले. त्याप्रमाणे एम.ओ.यु करण्यात आले. एमओयु करतेवेळी संतोष पाटील व जागामालक ईश्वर रायडु यांना रक्कम रुपये दिड लाख रोख व रक्कम रुपये एक लाखाचा धनादेश असे एकुण रक्कम रुपये अडीच लाख दिले. त्यानंतर नोंदणीसाठी दि.१५/१२/२०१४ हि तारीख ठरविण्यात आली. त्या मधल्या काळात संतोष पाटील व ईश्वर रायडू यांनी नोंदणीकामी त्यांच्याकडुन रोख रुपये एक लाख तीस हजार घेवून गेले. त्यानंतर त्यांनी रेडीरेकनरची फि रु.९०,२००/- कर्जतच्या बॅकेत भरली. त्यानंतर दि.१५/१२/२०१४ रोजी जागेचे नोंदणी करण्यात

आली. त्यावेळी रोख एक लाख रुपये भुपेश क्षिरसागर व ईश्वर रायडु यांना दिली व उदलेली रक्कम रुपये अडीचा लाखासाठी पुढील तारखेचा धनादेश दिला. काही दिवसांनी नोंदणी करतांना जे वकील हजर होते त्यांनी फोन केला व जागा मालक बनावट असल्याचे सांगितले. त्यादरम्यान ईश्वर रायडु व संतोष पाटील यांनी पुढील तारखेच्या धनदेशाच्या रक्कमेचे आगावु मागणी केली. त्यामुळे त्यांना संशय आला. त्यानंतर त्यांनी ईश्वर रायडु यास ऐरोली येथे रोख रक्कम घेण्यासाठी बोलावले. त्याठिकाणी त्यांची ईश्वर रायडु सोबत त्यांची बाचाबची झाली. तेव्हा ईश्वर रायडु हा त्यांच्या हातातुन निसटुन गेला. त्यानंतर त्यांनी रबाळे पोलीस स्टेशनला फिर्यादी दिली. त्यांनी दिलेली फिर्याद व प्रथमखबरी अहवाल अनु.क्र.नि.क्र. ३१ व ३२ वर असुन त्यावर त्यांची सही असल्याचे व त्यातील मजकुर खरा व बरोबर असल्याचे त्यांनी सांगितले.

३. अभियोगपक्षातर्फे तपासण्यात आलेले फिर्यादी साक्षीदार क्र. २ विलास कृष्णा मढवी यांनी त्यांच्या साक्षीत कथन केले की, सन २०१४ मध्ये ते दिघा येथे राहत होते. फिर्यादी हे त्यांचे जावाई आहेत. सन २०१४ मध्ये फिर्यादी यांना जागा हवी होती व ते जागेच्या शोधात होते. आरोपी संतोष पाटील याने त्यांना शेलु बांधीवली गाव येथे दाखविली. सदर जागेच्या कागदपत्रांची पडताळणी केली. त्यानंतर सदर जागेचा व्यवहार रक्कम रुपये ७,५०,०००/- ठरला. सदरचा व्यवहार त्यांच्या समक्ष झाला. त्यातील रक्कम टप्याटप्याने देण्याचे ठरले होते. काही रक्कम ही रोख व काही रक्कम ही धनादेशाद्वारे देण्यात आली व त्याप्रमाणे नोंदणी करण्यात आली. नोंदणी केल्यानंतर सदर व्यवहाराबाबत थोडी शंका निर्माण झाली. त्यांनतर त्यांना त्यांची फवणुक झाल्याचे समजले. त्यांनतर संतोष पाटील यास त्याच्या घरी बोलविण्यात आले. त्याची चौकशी केल्यानंतर त्याने फसवणूक केल्याचे मान्य केले. त्यानंतर त्यांनी रबाळे पोलीस स्टेशनला फिर्याद दाखल केली.

४. अभियोगपक्षाने सादर केलेल्या लेखी व तोंडी पुराव्याचा एकत्रीतपणे विचार करता आरोपीं विरुध्द दोषारोप साबीत होईल असा ठोस कागदोपत्री पुरावा अभिलेखावर आलेला नाही. अभियोगपक्षातर्फे जरी फिर्याद शाबीत करण्यात आली असली तरी घटनास्थळ व जप्ती पंचनामा शाबीत करण्यात आलेला नाही. सदर प्रकरणात प्रत्यक्षदर्शी साक्षीदार तपासण्यात आलेले नाहीत अथवा त्यांचा जबाब नोंदविण्यात आलेला नाही. सदर प्रकरणात कागदत्र शाबीत करण्याकरीता हस्ताक्षर तज्ञांचा अहवाल

अभिलेखावर नाही तसेच तज्ञास साक्षीदार म्हणुन तपासण्यात आलेले नाही. आरोपीविरुध्द आलेला पुरावा आरोपींना शिक्षा देण्या इतपत पुरक नाही. सदरचे प्रकरण हे १० वर्षापासुन प्रलंबित असुन सदर प्रकरणात आरोपी हे फरार आहेत. करिता सदरचे प्रकरण प्रलंबित ठेवणे न्यायोचित होणार नाही. त्यामुळे आरोपी दोषमुक्त होणेस पात्र आहेत. म्हणून येणेप्रमाणे अंतिम आदेश देण्यात येत आहे,

आ दे श

१. आरोपी क्र.१ दिनेश रामचंद भोईर उर्फ संतोष पाटील व आरोपी क्र.२ सत्येंद्रकुमार कौल उर्फ ईश्वर व्यंकटरेडडी रायडु यांची भारतीय दंड संहितेचे कलम ४२०, ४६५, ४६७, ४७१, ४६८ सहकलम ३४ खालील आरोपातून फौजदारी प्रकिया संहितेचे १९७३ चे कलम २३९ नुसार अन्वये दोषमुक्त करण्यात येत आहे.

स्वाक्षरीत/-
**(**प्रीती अ**.** श्रीराम**)**
९वे न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, बेलापूर

बेलापूर
दिनांक: १४/०२/२०२५